आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे | अंक दहावा | पृष्ठे ११ | ऑक्टोबर २०२३ | www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92



या अंकात

पान ०२ विलेपार्ले गणपती दर्शन २०२३

पान ०५ तुमने मुझे देखा..

पान ०८ विसरलेले समाज - ६ : ढोलावीरा

पान ११ उत्सव उद्योजकतेचा




पान ४
**मध ते मद्य पर्यंतचा प्रवास**
डॉ. योगिनी बुधकर

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्ताने ज्येष्ठांचा सन्मान




१ ऑक्टोबर रोजी ३३व्या जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्ताने लोकमान्य सेवा संघ येथे विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या ज्येष्ठांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता. उत्तर प्रदेशचे भूतपूर्व राज्यपाल श्री राम नाईक या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या हस्ते सामाजिक, सौंदर्य शास्त्र व साहित्य, पत्रकारिता, कला-सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा पाच क्षेत्रातील अनुक्रमे श्री अशोक किराणे, श्रीमती रेखा चिटणीस, श्री अरविंद कुळकर्णी, श्रीमती नीला भिडे आणि श्री अनिल गानू यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ लोकमान्य सेवा संघाचे अध्यक्ष श्री मुकुंद चितळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष श्री उदय तारदाळकर यांनी केले आणि आभार प्रदर्शन ज्येष्ठांसाठी कार्यरत दिलासा हेल्प लाईन केंद्राच्या अध्यक्षा श्रीमती बागेश्री परिख यांनी केले.




sales@atharvlifestyle.com | www.atharvlifestyle.com | Atharv Aaradhyam, Chandrashekhar CHS, Vijay Nagar, Sahar Road. | MAHARERA NO.: P51800052443

## संपादकीय

गेल्याच महिन्यात गणपती उत्सव धूमधडाक्यात पार पडला आणि ह्यावर्षीच्या सणासुदीच्या पर्वाला सुरवात झाली. पार्ल्यात सुद्धा दरवर्षीप्रमाणे अनेक मंडळांनी हा उत्सव साजरा केला. 'आम्ही पार्लेकर'च्या प्रतिनिधीने बहुतेक मंडळांना भेट दिली, त्याविषयीचे फोटोफिचर ह्या अंकात आलेलेच आहे.

ह्या निमित्ताने काही गोष्टींकडे लक्ष देणे, काही गोष्टींचा विचार होणे गरजेचे आहे. पहिले म्हणजे एक टिळक मंदिर सोडले तर इतर कुठल्याही मंडळाने उत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले नव्हते. ह्या उत्सवाच्या निमित्ताने आजुबाजुच्या मुलांच्या काही स्पर्धा, काही मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करायला काय हरकत आहे? टिळक मंदिराच्या कार्यक्रमांना सुद्धा गर्दी बेताचीच असते पण निदान वेगवेगळे कार्यक्रम होतात तरी. पार्ल्यातील इतर मंडळांच्या मूर्ती खूपच भव्य व देखण्या होत्या पण देखाव्यांचा दर्जा उंचावायला वाव होता. टिळक मंदिराची मिरवणूक सुद्धा पहाण्यासारखी असते. लेझीम पथक, पारंपरिक वेशातील नागरिक, आटोपशीर शिस्तबद्ध पद्धतीने ठरलेल्या मार्गावरून जाणारी हि मिरवणूक पाहून सुद्धा मन प्रसन्न होते. इतर बहुतेक मंडळांच्या मिरवणूका म्हणजे चित्रविचित्र पद्धतीने फिरणारे रंगीबेरंगी दिवे, DJ वर लागलेली, डेसिबलची मर्यादा न पाळणारी बीभत्स गाणी आणि त्या ठेक्यावर थिरकणारी तरुणाई. गेली अनेक वर्षे हेच चालले आहे.

लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या ह्या उत्सवाचे स्वरूप शतकभरात बदलणार, नव्हे बदललेच पाहिजे ह्याची आम्हालाही जाणीव आहे. कलाकारांच्या कलेला, तरुणांच्या उर्जेला आणि नागरिकांच्या भक्तीला ह्या उत्सवात योग्य स्थान असावे असेच आम्हाला वाटते. त्याच बरोबर गणपती हि विद्येची देवता आहे हे कसे विसरून चालेल? त्यामुळे ह्या सर्वांचा उचित संगम जर ह्या उत्सवात झाला तर सर्वांचेच समाधान होईल.

लोकं पार्ल्याच्या प्रत्येक गोष्टीकडे एका अपेक्षेने पाहतात, ह्याचीही जाणीव ठेवणे अगत्याचे आहे. त्या दृष्टीने सांस्कृतिक कार्यक्रम ठरवण्यासाठी पार्ल्यातील मंडळांना काही मदत लागली तर 'आम्ही पार्लेकर'चे दरवाजे सदैव उघडे असतील ह्याची खात्री बाळगा!

पार्लेकर
संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# विलेपार्ले गणपती दर्शन २०२३


विलेपार्लेचा राजा


विलेपार्लेचा विघ्नहर्ता


विलेपार्लेचा वक्रतुंड


विलेपार्लेचा गणराज


लोकसेवा मंडळ, हनुमान मार्ग


विलेपार्लेचा मोरया



विलेपार्लेचा चिंतामणी



विलेपार्लेचा विघ्नेश



नवयुग मित्रमंडळ, विलेपार्लेचा मोरया



विलेपार्लेचा विश्वविनायक



बाळमित्र मंडळ, कुंकूवाडी



बोरीचाळ रहिवासी संघ




# मध ते मद्य पर्यंतचा प्रवास

**पौधे आज बने हैं साकी,**
**ले ले फूलों का प्याला,**
**हर मधुऋतु में अमराई में**
**जग उठती है मधुशाला**

पार्ले येथील नवउद्योजिका डॉ. योगिनी बुधकरची मुलाखत घेतल्यावर 'मधुशाला' या सुप्रसिद्ध काव्याच्या काही ओळी माझ्या मनात अचानक तरंगल्या. योगिनी ही मधापासून मद्य बनवते आणि त्या मद्यास 'मीड' असं म्हणतात. योगिनी पार्ले टिळक मराठी माध्यमातली मुलगी.



तिने इन्स्टिट्युट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (युडीसीटी) मुंबईतून 'फुड इंजिनियरिंग ऍंड टेक्नॉलॉजी' विषयात पीएचडी केलं आहे. कोर्स करत असताना एकदा युकेतून आलेल्या प्राध्यापकांनी तिला मीडबद्दल सांगितलं. निसर्गप्रेमी योगिनीला मुळातच मधमाशांच्या सामाजिक वर्तनाविषयी कुतुहल होतं. त्यामुळे मीडबद्दल तिच्या मनात उत्सुकता निर्माण झाली. ते काही स्थानिक स्तरावर मिळत नव्हतं, त्यामुळे तिने स्वत:च ते बनवण्याचे प्रयोग करून पाहिले. अनेक सहविद्यार्थी, मैत्रीण अश्विनी देवरे आणि घरची मंडळी हे सगळेजण त्या प्रयोगातले जणू 'गिनिपिग'च होते. सर्वांना तिचे प्रयोग फारच आवडले. त्यातूनच तिच्या मनात 'आपणच एक मधुशाला उर्फ मीडरी स्थापन का करू नये ?' असे विचार घोळू लागले. विचाराचं रूपांतर हळूहळू ध्यासात झालं. २०१०-११ चे दिवस होते ते. काही काळ त्यावर विचार करण्यातच गेला. ध्येयसिद्धीसाठी मदतीची गरज होती, त्यामुळे तिला अश्विनीचं नाव आठवलं. कॅनडात तेव्हा शिकणार्या अश्विनीला ही कल्पना खूपच आवडली, अशा प्रकारे २०१३ साली संकल्पनेचा प्रवास सुरू झाला.

मीडरी स्थापन करायची ठरल्यावर योगिनीने २०१५ आणि २०१७ साली डेव्हिस, कॅलिफोर्निया येथे जाऊन मीडमेकिंग आणि त्याचा व्यवसाय हा अभ्यासक्रम केला. पुणे, नाशिक, कोट्टायमला जाऊन मधमाशा आणि त्यांचे पालन शिकून आली. वायनरीत एप्रेंटिसशीपही केली. तेव्हा एक्साईजचे नियम पाहिले तर मधापासून मद्य बनवणे हे त्यात नव्हतेच. त्यामुळे एक्साईज खात्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या भेटीसाठी मंत्रालयाच्या वार्या सुरू झाल्या. या कामात पराग अळवणी यांची खूप मदत झाली. साधारण नऊ महिन्यांनी भेट मिळाली पण योगिनीचा प्रोजेक्ट पर्यावरणस्नेही होता, स्थानिक शेतकरी आणि आदिवासी यांच्या फायद्याचा होता. त्यामुळे २०१७ च्या जूनमध्ये जीआर निघाला , त्यानंतर २०१८ साली जूनमध्ये सिन्नर एम आय डी सी मध्ये भाड्याने प्लॉट घेतला. त्यानंतर लायसन्स येई पर्यंत २०१९ नोव्हेंबरचा शेवटचा आठवडा उजाडला. अशा प्रकारे भारतातल्या मीड्स उत्पादनाचा पायाच या दोघींनी रचला असं म्हणता येईल. 'अपिस सिराना इंडिका' या भारतात आढळणाऱ्या मधमाशीच्या नावावरून मीडरीचं नाव ठेवलं 'सिराना मीड्स'. त्यानंतर डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी २० या काळात स्टॉक तयार केला. मग कोविड आला आणि दोन वर्षं तसंच हातावर हात धरून बसावं लागलं. पण तरीही दोघींनी हिंमत हरली नाही.

सध्या त्या फळं आणि मध यांच्यावर आधारित चार प्रकारच्या मीड्स बनवतात. त्यात जामुन , पोमोग्रेनेट व्हॅनिला, पीनॉट नॉयर, शेनन ब्लो ही त्यांची नावं आहेत. तसेच ब्ल्यू पी लव्हेन्डर ही गोकर्ण, लव्हेन्डर यांची फुले आणि मधापासून बनवलेली मीड आहे, तसेच फ्रेंच ओक, दालचिनी, आले आणि मध वापरून यूल स्पाईस हा वेगळा प्रकार त्यांनी काढला आहे. नैसर्गिक मधाची आणि सोबतच्या घटकांची मूळ चव राखणारी लो अल्कोहोल /हाय अल्कोहोल/ड्राय अशा सर्व मीड्स त्यात आहेत. मीड्सचे उत्पादन पर्यावरणस्नेही, उर्जास्नेही, पाण्याचा वापर कमीतकमी करणारे तर आहेच पण स्थानिकांना प्राधान्य देणारेही आहे. जांभुळ-मध महाराष्ट्र आणि बाजूच्या राज्यांतून तर लिचीचा मध बिहार आणि युपीतून येतो. विविध फुलांचा मध हिमाचल प्रदेश-कर्नाटकातून येतो. मधमाशांनी गोळा केलेला जास्तीचा मधच मधुमक्षिका पेटीतून काढून घेतला जातो. मधमाशांच्या तोंडचा घास पळवून घेतला जात नाही.

योगिनी म्हणाली, २०१३ सालापासून सुरू झालेले स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यात आठ दहा वर्षे लागली. मार्गातील अडचणींमुळे कधीकधी हा विचार सोडून द्यावासा वाटे पण आई-बाबा, आशा, आनंद बुधकर आणि नवरा दुर्गा माधव पटनाईक हे तिचे पाठीशी उभे राहिल्यामुळेच जिद्द सोडून दिली नाही. वाचकांनी खरोखरच तिच्या सिराना मीडरीची टूर जरूर एकदा करावी. तिची वेबसाईट आहे.

https://ceranameads.com





**सविता दामले**
**९९३०३ ११५४६**



**राममंदिरचा राजा**



**विश्वाचा राजा, श्रद्धानंद रोड**



**बाल गोपाळ मित्रमंडळ, मुंबईचा पेशवा**



**बालमित्र मंडळ, श्रद्धानंद रोड**



**एकदंत मित्रमंडळ, श्रद्धानंद रोड**



**मोंगीबाई रोडचा राजा**

# तुमने मुझे देखा..

आपली प्रिय पत्नी गीता बाली हिच्या अचानक निधनामुळे अभिनेता शम्मी कपूर मनाने संपूर्ण मोडून पडले होते. पदरात दोन छोटी मुलं होती. त्यांचं भवितव्य काय या चिंतेने त्यांना ग्रासलं होतं. हातात असलेल्या चित्रपटांच्या सेटवर जाणं सोडलं होतं. मी आता चित्रपटात काम करणार नाही असं जाहीर केलं. त्यामुळे सेटवरील अर्धवट राहिलेल्या चित्रपटांच्या निर्माता दिग्दर्शकांचे धाबे दणाणले. त्यांनी बडे पापाजी म्हणजे पृथ्वीराज कपूर यांना साकडं घातलं. पापाजींनी सुपुत्र शमशेर राज कपूर उर्फ शम्मीला खडसावलं. 'दु:ख पुरे. काम सुरू कर' अनिच्छेने शम्मी सेटवर पोहोचले. तो चित्रपट होता 'तीसरी मंझिल'. एका गाण्याच्या रेकॉर्डिंगची तयारी सुरू होती. ते गाणं म्हणजे.. तुमने मुझे देखा.. कमालीचं रोमँटिक..




चित्रपटातील निर्णायक गीत. पत्नीच्या निधनानंतरचं पहिलं रेकॉर्डिंग.. एक रोमँटिक गाणं. आयुष्यातील विसंगती म्हणतात ती हीच. परंतु कॅमेऱ्यासमोर उभं राहिल्यावर मात्र पहिला शम्मी परतून आला. गाणं नीट रेकॉर्ड झालं. चित्रपट व्यवस्थित पूर्ण झाला.

सुनिता.. आशा पारेख.. आपल्या मोठ्या बहिणीच्या, रूपाच्या खुन्याचा, रॉकीचा शोध घ्यायला मसुरीला आली आहे. प्रवासातच तिची गाठ ड्रमर असलेल्या अनिल उर्फ रॉकीशी.. शम्मी कपूर.. पडते. स्वभावाने मनमौजी असलेला रॉकी तिच्या प्रेमात पडतो. पण ही रूपाची बहीण आहे आणि रूपाच्या खुन्याचा शोध घ्यायला मसुरीत आली आहे, हे कळल्यावर आपली खरी ओळख लपवतो. जेव्हा एकमेकांच्या मनातील खऱ्या प्रेमाची खात्री पटते, तेव्हा वस्तुस्थिती एका पत्रात लिहून सुनीताला पोहोचवण्याची व्यवस्था करतो. संध्याकाळच्या भेटीत गाण्यातून आपलं प्रेम व्यक्त करतो.. 'तुमने मुझे देखा.. होकर मेहेरबाँ'.. भूतकाळ जाणूनही माझा स्वीकार केला आहेस.. माझ्याकरता जणू हा क्षण गोठून राहिला आहे.. रुक गयी ये जमीं.. थम गया आसमाँ...

संगीतकार राहुल देव बर्मन यांचा स्वतंत्रपणे संगीत दिलेला हा पहिला चित्रपट. चित्रपटात एकूण सहा गाणी आहेत. या गाण्यांनी आजवरच्या हिंदी सिने संगीताचा चेहरा-मोहराच बदलून टाकला... नायक हॉटेल मधला ड्रमर असल्यामुळे ड्रम, सेक्सोफोन, गिटार सारख्या



पाश्चात्त्य वाद्यांवर घेतलेल्या, 'ओ हसीना जुल्फोंवाली', 'आजा आजा मैं हुं प्यार तेरा', 'ओ मेरे सोना रे..' सारख्या गाण्यांनी धुमाकूळ घातला. सगळी गाणी तरुणांच्या गळ्यातला ताईत बनली. याचं श्रेय जितकं पंचमदांचं, तितकंच चटपटीत शब्द लिहिणारे गीतकार मजरूह सुलतानपुरी आणि मनहारी सिंग सारख्या वादकांचं.. आपल्या या यशाचं श्रेय पंचमदांनी, गीतकार मजरुह यांना दिलं आहे. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यातली सगळी गीतं रफी साहेब आणि आशाताईंनी गायली आहेत. लताबाई नसल्या तरी गाणी यशस्वी.. सुपरहिट.. होऊ शकतात हे यातून सिद्ध झालं. रफी साहेबांनी गाणं इतक्या हळुवारपणे गायलं आहे की .. श्वास भारे सूर डहुळेल का.. असं म्हणावंसं वाटतं....



**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

# लता गुठे यांना 'ना. धों. महानोर' राज्य काव्य पुरस्कार

जालना येथील उर्मी संस्थेच्या वतीने आयोजित स्व. कृषीधन कवी ना. धों. महानोर राज्यकाव्य पुरस्कार दरवर्षी वेगवेगळ्या कवींची निवड



करून त्यांना दिला जातो. यावर्षी कवयित्री, प्रकाशिका लता गुठे यांना हा पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. या अगोदर हा पुरस्कार कवी ग्रेस, ना. धों. महानोर यांना देण्यात आला आहे. लता गुठे यांचे 'मी आहे तिथे', 'पुन्हा नव्याने, 'जीवनवेल', 'हुंकार अस्वस्थ जाणिवांचे', 'जगण्याच्या आरपार', 'इटुकले पिटुकले', चांदनबाग, गंम्डी गंमत यासारखेच नऊ काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. लता गुठे यांचा २८ ऑक्टोबर रोजी जालना येथे सन्मानपत्र, पुष्पगुच्छ व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

# कल्पना कालेकर यांना महापौर पुरस्कार

१४ सप्टेंबर रोजी अण्णा भाऊ साठे नाट्यगृह येथे बृहन्मुंबई महानगर पालिका आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ २०२२-२०२३' संपन्न झाला. या पुरस्कार समारंभात पार्ले टिळक प्राथमिक शाळा इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ.कल्पना कालेकर यांना महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री श्री दीपक केसरकर यांच्या हस्ते २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी महापौर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. कल्पना कालेकर या शिक्षण क्षेत्रात गेली ३१ वर्षे कार्यरत आहेत तसेच त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला आकार देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.








आजची कविता एकदम सोपी, रोजच्या व्यवहारात अनुभवास येणारी व म्हणूनच मनोमन पटणारी आणि हृदयाच्या कप्प्यात घर करून राहणारी. खरं तर ती मला आधी अनुभवास आली आणि मग शब्दरूपाने भेटली.


ते असं झालं की एका बेसावध सकाळी झाडांना पाणी घालताना अचानक लक्षात आलं की एक शिंपी पक्षी ( ौीूप्दूप्दस्दे एलूदीग्ले ) आमच्या एका बाल्कनी मधील सोनचाफ्यावर घरटं विणतोय. आम्ही अगदी मोहोरून गेलो. पण तो अगदीच लाजाळू. जराशी जरी चाहूल लागली तरी लगेच पसार होई. मग त्याला सुरक्षित वाटावं म्हणून आम्ही लगेच त्या बाल्कनी व खोलीमधील पडदा बंद केला. त्या खोलीमधील व अगदी खोलीबाहेरचे सर्व व्यवहार दबक्या पाउलांनी व कुजबुजत्या आवाजात होऊ लागले. तेथील झाडांना पहाटे पहाटेच ( अगदी गजर लावून ) पाणी घातले जाऊ लागले. त्या फ्लॉवर बेड मधील प्राजक्त, सोनचाफा व रातराणी सारखी सर्व फुले त्या काळात झाडांवरच सुकू देण्यात आली. मधेच धोका पत्करून फटीतून त्याची प्रगती तपासायचो. तो त्याच्या त्या चिंचोळ्या खोल घरट्यात गुडूप बसलेला असे मान वर करून . फक्त त्याच्या लांब निमुळत्या चोचीचे दर्शन होई. आम्ही बघतोय हे त्याला कळलं की मग तो 2/3 दिवस फिरकायचा नाही. आम्ही हळहळायचो. मग तो परत येई आणि आम्ही हरखून जायचो. सारं घर नुसतं याच बिंदू भोंवती

# 'घर'

घुटमळत होतं 2 महिने. खरं तर त्याचे घरटं विणणे, त्याची अंडी, पिल्लं, त्यांची वाढ सर्व जवळून बघायचं होतं व कॅमेऱ्यात पकडायचं होतं. पण आम्ही तो मोह कसोशीने टाळला. फक्त त्यांच्या चाहुलीवरून व चिवचिवाटावरून प्रगती अजमावत राहिलो कारण पुढच्या विणीच्या हंगामात आम्हाला तो परत यायला हवा होता.

पुढं अचानक एक दिवस जाणवलं की घरटं आता रिकामं आहे. त्याचा सर्व संसार यशस्वीपणे पूर्ण झाला आहे. खूप बरं वाटलं आणि वाईटही. ते रिकामं घरटं पाहवेना. आतापर्यंत 'स्ट्रिू हो ब्हीदरु' चा स्पर्शही नसलेल्या आम्हाला ते घरट्याच रिकामपण अगदी अंगावर आलं त्याचं भरलेपण प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितलं नसल तरी . आता फक्त पुढच्या हंगामात त्याची वाट बघणं हाती उरलं. अशी पाखरे येती.......

मग एक दिवस कोणा परिचिताने पाठवलेली एका निनावी कवीची ही सुंदर व समर्पक कविता वाचनात आली. त्या पक्षालाच ही अर्पण आहे जर या कवीचे नाव कुणास माहित असेल तर कळवावे.



**प्रसाद आठल्ये**
९८२०६ १३४४५

**घर बांधतोय घरासारखं......**

मी घर बांधतोय घरासारखं...
आणि हा पक्षी माझ्याच घरात घर बांधतोय मनासारखं.
मी विचारलं त्याला,
बाबारे ना तुझ्या नावाचा सातबारा
ना तुझ्या नावाचं मुखत्यारपत्र...
तर म्हणाला....
अरे सोपं असतं का
कुणाच्या घरात जागा करणं आणि
कुणाच्या मनात घर करणं ?
म्हणाला, माझं घर तर काड्यांचं आहे.
तुझं घर माडीचं आहे.
नात्यांची घट्ट वीण, विणत गेला नाहीस,
तर माडीचं घरसुद्धा
काडीमोलाचं असतं.....
मला वाटायचं,
माझ्यामुळे त्या पक्षाचं घर झालं..
आता वाटतंय,
त्याच्यामुळेच माझं
विचारांचं प्लास्टर पक्क झालं.....
आता त्याचा चिवचिवाट
माझ्यासाठी पसायदान असतो.
तो डोळे झाकून घरट्यात बसला की
समाधिस्थ बुद्ध वाटतो......
त्या पक्षाने एवढं शिकवलं मला,
एका घराची दोन घरं होण्यापेक्षा
'घरात घर करून राहणं' कधीही चांगलं.
( रचयिता अज्ञात)

# सुमेध वडावाला यांना स्नेहांजली पुरस्कार

'स्नेहल प्रकाशना' तर्फे दिला जाणारा स्नेहांजली पुरस्कार डॉ.गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते सुमेध वडावाला यांना नुकताच प्रदान करण्यात आला. 'नाना संकटांचा सामना करून स्वत:चं वा समाजाचं यशस्वी आयुष्य घडवणाऱ्या अनेक नायकनायिकांच्या आत्मकथा हातून लिहिल्या



गेल्यामुळेच 'स्नेहांजली पुरस्कार' दिला गेला असावा, म्हणून हा पुरस्कार त्या सर्व आत्मकथानायक नायिकांनाच समर्पित करतो आहे.' असे भावपूर्ण उद्गार साहित्यिक सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी काढले. कथा-कादंबरीलेखनात लौकिक मिळालेला असूनही वडावाला आवर्जून आत्मकथालेखनाकडे वळले. नामवंत प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या सर्व १४ आत्मकथांना विपुल आवृत्त्यांचा योग प्राप्त झाला. 'या लेखनामुळे, एकाच आयुष्यात अनेक आयुष्यं जगण्याची दुर्लभ संधी मिळाली, जगण्यातली कल्पनातीत जटीलता जगापुढे मांडता आली' असे त्यांनी नमूद केलं. स्वत:च्या लेखनाचा सदतीस वर्षांचा पट त्यांनी संक्षिप्तपणे उलगडून दाखवलेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांनी गर्दी केली होती.



## STUDY DESTINATION

- Study In Australia
- Study In UK
- Study In USA
- Study In Canada
- Study In Europe
- Study In Germany
- Study In Ireland
- Study In New Zealand
- Study In Asia

## OUR SERVICES

- Counselling
- Test Preparation (IELTS, TOEFL, PTE, GRE, GMT, SAT)
- Course, Country & University Selection
- Application & Admission
- Scholarships
- Internships (USA, AUSTRALIA)
- Education Loan
- Visa Processing
- Allied Services - Money Transfer
- Accommodation Guidance
- Work and Travel Assistance




Highgate Academy (India)
www.haindia.com

QR code for Website URL
SCAN ME

### HIGHGATE ACADEMY INDIA

B-309 Kadamgiri Apartment,Hanuman Road,
Vile Parle (East),Mumbai – 400057, Maharashtra, India

Call: +91-98704 99953 / 79776 68816

E-mail: info@haindia.com

highgateacademy

highgate_ind

# विसरलेले समाज - ६ : ढोलावीरा

देशोदेशी

मी आजपर्यंत ह्या 'देशोदेशी' सदरात आपल्याच देशातील माझ्या प्रवासांत आलेल्या चित्र-विचित्र अनुभवांबद्दल कधी लिहिलं नाही. कारण मला असं वाटलं की आपण सगळे इथेच वाढलो, इथेच राहतो, इथलाच इतिहास/भूगोल शाळेपासून शिकलो, त्यामुळे मी नवीन असं काय सांगू शकणार? पण गुजरात येथील ढोलावीराच्या (आणि लोथल) भेटीतील अनुभवावरून असं वाटलं की त्याबद्दल काहीतरी रोचक लिहिणं शक्य आहे. कारण इथल्या दोन्ही भेटींच्या वेळी, आमचा गट सोडून तिथे कुठल्याच रंगाचं नुसतं कुत्रंच नव्हे तर मांजर आणि उंदीर सुद्धा नव्हते. दिवसानुदिवसात कोणी तिथे आलं असेल अश्या काही खुणा दिसत नव्हत्या. तेथील छोट्याश्या संग्रहालयात जेंव्हा मी ASI ने (Archeological Survey of India) प्रसिद्ध केलेली एक माहिती-पुस्तिका विकत घेतली, तेव्हा त्या खिडकीत बसलेल्या माणसाच्या चेहेऱ्यावर 'कोणीतरी इथे आलं आणि चक्क ती पुस्तिका विकत घेतली म्हणजे सूर्य आज पश्चिमेला उगवला की काय?'असा भाव मला स्पष्ट दिसला! असो.

हजारो वर्षांपूर्वी इथे नांदणाऱ्या समाजाने मागे ठेवलेल्या आपल्या पाऊलखुणा मात्र चकरावून टाकणाऱ्या आहेत. भारतीय संस्कृतीच्या प्राचीनतेसंबंधित दंतकथा, भाबड्या समजुती आणि Whatsapp विद्यालयात मुद्दाम पसरवलेल्या भाकडकथा बाजूला ठेवून, फक्त पुरातत्वशास्त्राने मान्यता दिलेले पुरावेच पाहीले तरी इथे किमान गेली ६-७ हजार वर्षं तरी प्रगत मानवी समाज नांदले असं नक्कीच म्हणता येईल. अर्थात एखादी संस्कृती जरी एव्हढा दीर्घकाळ सलगपणे जिवंत राहिली तरी ती कायम बदलत राहते - कला, शास्त्र, धर्म-विचार, सामाजिक आदर्श, राजकीय संस्था अशा सर्व बाजूंनी सतत उत्क्रांती होतच राहते. पण जरी सद्य:स्थिती आणि 'ती पुराणकालीन' स्थिती ह्यात जमीन अस्मानाचा फरक दिसला तरी, 'तेंव्हापासून' ते 'आजपर्यंत' झालेल्या ह्या प्रवासात एक अखंडता असते. झालेले बदल 'एकावेळी एक छोटं पाऊल पुढे' असे, पण सातत्याने होत राहातात. मात्र कधीकधी हा उत्क्रांतीचा रस्ता मध्येच एखाद्या अनुल्लंघनीय दरीपाशी येऊन खंडित झालेला दिसतो आणि ह्या दरीच्या दुसऱ्या काठापासून एका नवीनच सांस्कृतिक प्रवासाची सुरुवात झालेली दिसते.


ढोलावीराचे भग्नावशेष **(पहा पहिला फोटो)** अश्याच एका खंडित प्रवासाचा अंतिम



टप्पा असावा असं वाटण्याइतकी तेथील सांस्कृतिक चिन्हे आपल्याला सर्वसाधारणपणे परिचित 'भारतीय संस्कृती' पेक्षा भिन्न प्रकृतीची आहेत. त्यांची नगर-रचना, स्थापत्य, भाषा/लिपी, शिल्पाकृती आणि भित्तीचित्र आणि त्यांत डोकावणारे सामाजिक/धार्मिक आचारविचार, कपडे/आभूषणं सर्वच गोष्टीत हे वेगळेपण जाणवतं.

सिंधू नदीचं खोरं आणि त्या सभोवतालच्या विस्तृत प्रदेशात दीर्घकाळ नांदून गेलेला हा प्रगत समाज हजारो वर्षं पूर्णपणे विसरला गेला होता. साधारणपणे ख्रिस्तपूर्व ३५०० (काही लोकांच्या मते त्याही पूर्वी आणखी २००० वर्षं) ते ख्रिस्तपूर्व १५०० पर्यंत बहरलेल्या ह्या सिंधू-संस्कृतीच्या खुणा विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आजच्या पाकिस्तानातील हडप्पा आणि मोहेंजडदो गावांनजीक प्रथम सापडल्या. त्यापुढील शंभर वर्षांत ह्या समाजाचे अवशेष जवळ-जवळ एक हजार ठिकाणी - आजच्या पाकिस्तानातल्या सिंध / पंजाब / बलुचीस्तानपासून ते भारतातल्या उत्तर प्रदेश पर्यंत आणि अफगाणिस्तानपासून भारतातल्या गुजरात पर्यंत सापडले आहेत.

कच्छच्या सफेद वाळवंटाच्या **(पहा दुसरा फोटो)** काठावरील ढोलावीरा निर्विवादपणे सिंधू संस्कृतीच्या प्रमुख शहरांपैकी एक होतं (आज पर्यंत सापडलेल्या सर्वात मोठ्या ५ जागांपैकी ते एक



आहे). जाड टोपीच्याही आत शिरून डोक्याला चटके देणाऱ्या रणरणत्या उन्हातून चालत असता जेंव्हा ढोलावीराची भव्य तटबंदी **(तिसरा फोटो)** नजरेसमोर आली, तेंव्हा मला एक जुनी



कविता अचानक आठवली - 'प्रत्येक भग्न भिंतीत दडलेली असते एक कथा - प्रेमाची, क्रौर्याची, औदार्याची आणि मृत्युचीही, पण तुमच्या छातीत एक हृदय पाहिजे ती ऐकण्यासाठी". असा काहीसा तिचा आशय होता. तटाची भिंत चढून आतील शहरात गेल्यावर, चहुबाजुच्या भग्नावशेषांतून ह्या नगरीच्या वैभवशाली इतिहासाच्या अश्याच कथा तुम्हाला ऐकू येतात - शहराच्या उच्चभ्रू आणि मध्य-वस्तीला विभागणाऱ्या मैदानात होणाऱ्या आनंदोत्सवांच्या, ह्या निर्जल वाळवंटाच्या मध्येसुद्धा शहराला मुबलक पाणीपुरवठा करणारी कल्पक यंत्रणा उभारणाऱ्या कुशल अभियंत्यांच्या, शहराच्या बंदरापासून मेसोपोटेमिया, इजिप्त, ओमान अश्या दूर-दूरच्या बाजारपेठांपर्यंत व्यापार करणाऱ्या धाडसी खलाश्यांच्या आणि शेवटी ह्या वैभवाचा अचानक अंत झाल्याने देशोधडीला लागलेल्या नागरिकांच्या अश्रूंच्याही!

ढोलाविराचं प्राचीन शहर तीन भागात विभागलेलं असावं. या तिन्ही भागांना मजबूत तटबंदी बांधलेली दिसते. वरच्या उच्चभ्रु भागात, व्यवस्थित बांधलेली आणि मोठ्या आकाराची घरं असावी. **(पहा चौथा आणि पाचवा फोटो).** त्या काळातले महत्त्वाचे लोक,





प्रशासकीय अधिकारी ई. तिथे रहात असावेत. मधल्या भागात कदाचित त्यांची ऑफिसेस असावीत. तसंच व्यापारी, कलाकार आणि कारागिर तिथे रहात असावेत. सर्वात खालच्या विभागात मध्ये सामान्य लोक, कामगार वर्ग राहात असावा. तसेच ह्या विभागात धातुकाम, पॉटरी, दागिने, मणी अश्या वस्तू बनविण्याचे कारखाने असावेत. अश्या वस्तू मेसोपोटेमिया, ओमान अश्या दूर-दूरच्या बाजारपेठांत निर्यात होत होत्या.

शहरातले अंतर्गत रस्तेही त्या काळाच्या तुलनेत प्रशस्त आणि उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम अशा चारी दिशांना जोडणारे, व्यवस्थित आखणी केलेले होते. आणखी एक नवलाईची गोष्ट इथे सापडली जी जगातील कुठलाही समकालीन संस्कृती (इजिप्त, मेसोपोटेमिया) मध्ये आढळलेली नाही. अप्पर टाउन आणि मिडल टाउन ह्याच्या मध्ये एक प्रचंड ॲंफिथिएटर सारखं बांधकाम दिसून आलं, जेथे बहुधा धार्मिक समारंभ किंवा क्रीडा-महोत्सवा सारखे सार्वजनिक कार्यक्रम होत असावे.

ढोलाविराचं ठिकाण एका बाजूला वाळवंट आणि दुसऱ्या बाजूला समुद्र आणि ह्या समुद्राला मिळणाऱ्या मनसर आणि मनहर ह्या दोन हंगामी नद्यांच्या मध्ये होतं. इथे वाळवंटात एकतर पाऊस क्वचितच पडतो, आणि जेव्हा पडतो तेव्हा ढगफुटीसारखा पडतो. अश्या ढगफुटीमुळे या दोन्ही नद्यांना मोठाले पूर यायचे. त्या पाण्यावर अनेक बांध घालून ते पुराचं पाणी शहरात वळवलेलं होतं. हे पाणी शहरातल्या हौदांमध्ये येई. आधी खालचा, तो भरला की पुढचा, तो भरला की पुढचा असे सगळे हौद भरण्याची व्यवस्था होती. **(पहा सहावा फोटो -** अश्याच एका हौदाचा. फोटोत दिसणाऱ्या भगदाडातून



पाणी जाऊन त्या खालच्या पातळीवरचा हौद भरला की नंतर ह्या हौदात भरत असे). तसंच पुराचं अतिरिक्त पाणी नगरात घुसून नासधूस होऊनये म्हणून शहराभोवतीच्या खंदकात सोडलं जाई. त्याची ह्या उष्ण वाळवंटात शहराचं तपमान कमी होण्यासही मदत होत असावी आणि शहरातील विहिरींचे पूरक झरे कायम जिवंत राहावे म्हणून हे अतिरिक्त पाणी मुद्दाम जमिनीत जिरविण्यासाठी चरही खणलेले असावेत. त्यामुळे पाण्याचं दुर्भिक्ष आणि पावसाची अनिश्चितता असली तरी शहरात कायम पाणी खेळतं होतं.

पण ३५०० वर्षांपूर्वी इथे असं काय घडलं की हे समृद्ध शहर सभोवतालच्या समुद्रासह वाळवंटात अदृश्य झालं? आणि फक्त त्या समुद्राचे अवशेष, म्हणजे मिठाने भरलेलं कच्छचं पांढरंशुभ्र रण एव्हढच तिथे शिल्लक राहिलं?

एक मत असं आहे कि अचानक आलेल्या त्सुनामी सारख्या उत्पातामध्ये हे शहर उध्वस्त झालं. ह्याला पुष्टी देणारे निष्कर्ष नॅशनल



इंस्टिट्युट ऑफ ओशोनोग्राफीच्या अभ्यासातून काढता येऊ शकतात. तसेच इथली मजबूत तटबंदी (जवळजवळ 18 मीटर रूंदीची आणि खालच्या भागामध्ये तर जवळजवळ 25 मीटर रूंदीची) पाहता कदाचित त्सुनामी सारख्या घटना इथे घडत असाव्या. कारण त्याकाळी जगात अशा फारच थोड्या प्रगत संस्कृती होत्या ज्या सिंधू संस्कृतीच्या लोकांवर हल्ले करू शकतील. त्यामुळे परकीय आक्रमकांपासून संरक्षण मिळावं म्हणून ही तटबंदी नक्कीच बांधली गेली नव्हती. मात्र दुसरं मत असंही आहे की, नैसर्गिकरित्या झालेल्या वातावरणातील बदलामुळे, समुद्र आटत गेला, चहूबाजूला आज दिसणारं वाळवंट आलं. पावसाचं प्रमाणही इतकं कमी झालं की ढोलावीराची पाणी साठविण्याची कल्पक यंत्रणासुद्धा त्यापुढे तोटकी पडली, आणि म्हणून येथील लोकं दाही दिशांना परागंदा झाले. पण इथल्या लोकांचं पुढे काय झालं, ते अचानक आपलं शहर सोडून कुठे गेले, मुळात ते कुठून आले होते, त्यांच्याकडे इतकं प्रगत शहर वसवण्याचं ज्ञान, विज्ञान, कला कुठून आली या प्रश्नांची ठोस उत्तरं संशोधक अजूनही शोधत आहेत. १०० वर्ष प्रयत्न करूनही त्यांच्या लिखाणाची फोड करता न आल्यामुळे, आजही, ते कुठली भाषा बोलत होते, त्यांची समाज आणि


पान ९ वर

पान ८ वरून

## विसरलेले समाज - ६ : ढोलावीरा

राजकीय व्यवस्था काय होती, त्यांची आर्थिक यंत्रणा कशी चालायची ह्या बद्दल कल्पना लढविण्या पलीकडे फारसं काही आपण करू शकत नाही.

आज कच्छ मध्ये प्रवाश्यांची गर्दी होते, तिथे दर वर्षी होणाऱ्या रणोत्सवात मौज-मजा करायला. त्यातील किती लोकांचे पाय हा आपला अद्भुत वारसा निरखण्यासाठी ढोलावीराकडे वळतात कोणास ठाऊक ?



सतीश जोशी
९८२०२२८२७९

## अंधेरी वाचन कट्टा - चित्रा वाघ यांचा महाकवी भासाची 'प्रतिभा आणि प्रतिमा' या विषयावर बहारदार कार्यक्रम

रविवार दिनांक १० सप्टेंबर रोजी 'अंधेरी वाचन कट्टा' चा २२ वा कार्यक्रम चिल्ड्रन्स वेल्फेअर महाविद्यालय, वर्सोवा येथे संपन्न झाला. या कार्यक्रमात चित्रा वाघ यांनी 'महाकवी भासाची प्रतिभा आणि प्रतिमा' या विषयावर एक बहारदार कार्यक्रम सादर केला.



त्याचप्रमाणे अभिजात संस्कृत साहित्यातील आद्य नाटककार भास यांच्या प्रतिभेतून साकारलेल्या 'प्रतिमा' या रामायणावर आधारित प्राचीन नाटकाचा रसाळ भाषेत आणि ओघवत्या शैलीत परिचय करून दिला. 'प्रतिमा' या पाच अंकी संस्कृत नाटकातली पताकास्थाने, पात्रांचे परस्पर संबंध, शीर्षकाचे औचित्य, प्रतिमागृहात घडणारे नाट्य असे अनेक बारकावे ऐकताना श्रोते रंगून गेले. तत्कालीन समाजाच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याकडे बघण्याच्या प्रगल्भतेकडेही त्यांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधले. चित्रा वाघ यांचे निवेदन संपल्यावर त्यांनी श्रोत्यांच्या शंकांना समाधानकारक उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या शेवटी अंधेरी वाचन कट्टाचे ज्येष्ठ सभासद प्रफुल्लचंद्र पुरंदरे यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाचा शेवट झाला.

## पार्ल्यातील वृक्षवैविध्य

### 'रुद्राक्ष' Eleocarpus serratus

आजचा वृक्ष हा पार्ल्यातील एकमेव वृक्ष असावा. Eleocarpus serratus 'रुद्राक्ष' Family Eleocarpaceae.

हा वृक्ष पार्लेश्वर मंदिराच्या आवारात, प्रवेशद्वाराच्या उत्तरेकडे आहे. ह्या वृक्षाची पानं थोडी लांबट व चकचकीत असतात. हा वृक्ष अजून लहान आहे, त्यामुळे त्याला आजतागायत फुलं आलेली नाहीत. ह्या वृक्षावर हिरवट पांढरी फुलं येतात. फुलांचं परागीभवन रात्री उडणाऱ्या कीटकांमार्फत होतं (Moths) ह्याची फळं थोडी लांबट आकाराची व हिरवी असतात. फळं चवीला आंबट असतात. ती खाद्य असून त्यांचं लोणचं करतात. वृक्षाचं खोड, पानं, फळं सर्व विविध औषधांमधे वापरतात.

मुळ रुद्राक्ष हा Eleocarpus serratus हा असून तो हिमालयात आढळतो. त्याची फळं गोल व निळसर रंगाची असतात. ह्या रुद्राक्षाच्या टणक बियांच्या माळा करतात. बियांवर उभ्या रेखा असतात व त्यांच्या संख्येनुसार रुद्राक्ष एक मुखी, दोन मुखी, पांच मुखी असे ओळखले जातात. रुद्राक्षांच्या माळा शरीरावर धारण करतात, जप करण्याकरता देखील त्या वापरतात. रुद्राक्ष हे औषधी आहेत.








श्रीकांत सावरकर
९२२३३१४९०९

## 'स्वर-साधक' पुस्तकाचे प्रकाशन

शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात आपली उत्तुंग कारकीर्द घडवणाऱ्या पंधरा दिग्गज कलावंतांच्या सांगितिक कारकिर्दीवर प्रकाश टाकणारे 'स्वर-साधक' हे पुस्तक आहे. या




पुस्तकात लेखिका सुलोचना देवलकर यांनी सर्व दिग्गजांशी मुलाखतींच्या निमित्ताने साधलेला मनमोकळा संवाद आहे. यातील अनेक कलाकार आता हयात नसल्यामुळे या मुलाखती अधिकच मौलिक झाल्या आहेत.

लेखिकेने मुलाखतींमधून या कलाकारांची संगीत साधना, आयुष्याची क्षणचित्रे, करावा लागलेला संघर्ष, आलेले अनुभव, मिळालेले मानसन्मान यांसह कलाकारांचे शक्य तितके दर्शन घडविले आहे. संगीत क्षेत्रात वाटचाल करु इच्छिणाऱ्या नव्या पिढीतील कलाकारांनी हे पुस्तक जरूर वाचावे, कलावंतांच्या वाटचालीतून प्रेरणा घ्यावी व आपल्या संगीत साधनेचे मार्ग शोधावेत या हेतूने हे पुस्तक लिहीले आहे.

पुस्तकाला प्रस्तावना विख्यात गायिका आशा खाडिलकर यांची आहे तर अतिशय समर्पक असा शुभेच्छा संदेश सुप्रसिद्ध साहित्यिका माधवी कुंटे यांनी दिला आहे.

## महिला संघात २०२४ पासून C B S C

'विलेपार्ले महिला संघ' ही विलेपार्ले पूर्व येथील प्रथितयश संस्था एप्रिल २०२४ पासून CBSC बोर्डाशी संलग्न पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सुरू करत आहे. या नविन उपक्रमाने पालकांची बऱ्याच दिवसांपासूनची मागणी पूर्ण होणार आहे तसेच विलेपार्ले पूर्व येथील CBSC बोर्डाशी संलग्न शाळेची कमतरता भरून निघणार आहे.

'विलेपार्ले महिला संघ' ही पूर्णपणे महिलांनी चालवलेली संस्था १९५२ पासून शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे. सध्या ही संस्था मराठी व इंग्रजी माध्यमाची SSC बोर्डाची शाळा, CISCE बोर्डाची ओरायन शाळा तसेच SNDT विद्यापीठाशी संलग्न महिला महाविद्यालय असे उपक्रम यशस्वीरित्या चालवत आहे व येथून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करत आहेत.

याशिवाय विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी फूटबॉल, क्रिकेट, बॅडमिंटन, स्केटिंग, टेबल टेनिस, बुद्धिबळ, नृत्य, गायन, अभिनय, ड्रॉईंग, जिम्नॅस्टिक्स, UCMAS असे उपक्रम संस्थेतर्फे चालवले जातात.

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी CBSC शाळेची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होत आहे. अधिक माहितीकरिता या फोन नंबरवर
+९१ ९८२०९३९२७२,
०२२-२६१६९७४५
सकाळी ९ ते १२ या वेळेत संपर्क साधावा.



# बॉईज ४

हल्ली हिंदी चित्रपटांप्रमाणे मराठीत सुद्धा चित्रपटाचे पुढचे भाग निर्माण करण्याचा ट्रेंड आला आहे. 'बॉईज' हा चित्रपट यशस्वी झाल्यावर बॉईज २, बॉईज ३ असे त्याचे भाग आले आणि ते सुद्धा गाजले. आता या महिन्यात बॉईज ४ हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. सुमंत शिंदे, पार्थ भालेराव आणि प्रतिक लाड यांच्यासोबत बॉईजमध्ये झळकलेली ऋतिका श्रोत्री 'बॉईज ४' मध्येही दिसणार असून यात अभिनय बेर्डे, निखील बने, गौरव मोरे,रितुजा शिंदे, जुई बेंडखळे ही नवी गँगही सहभागी झाली आहे. 'बॉईज' हा मराठी सिमेसृष्टीतील पहिला चित्रपट आहे, ज्याचे चार भाग आले आहेत आणि यातील प्रत्येक भागात काहीतरी सरप्राईज होते. आता 'बॉईज ४' मध्येही कलाकारांची जबरदस्त फळी दिसत आहे. आता यात कोणाच्या काय व्यक्तिरेखा आहेत आणि कोण काय काय धमाल करणार आहेत, हे मात्र २० ऑक्टोबरला 'बॉईज' आल्यावरच कळेल. सुप्रीम मोशन पिक्चर्स प्रा. लि. प्रोडक्शन अंतर्गत एव्हरेस्ट एंटरटेनमेंटसह अवधूत गुप्ते प्रस्तुत या चित्रपटाचे लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे, संजय छाब्रिया निर्माते आहेत तर विशाल सखाराम देवरूखकर दिग्दर्शित या चित्रपटाचे लेखन हृषिकेश कोळी यांनी केले आहे. बॉईज मधील धैर्या, ढुंग्या आणि कबीर या व्यक्तिरेखांची धमाल तुम्ही अनुभवली आहे. दिग्दर्शक विशाल देवरूखकर म्हणतात, ''आतापर्यंत धैर्या, ढुंग्या आणि कबीरची मस्ती तुम्ही पाहिली आता ही मस्ती आणखी वाढणार आहे. 'बॉईज ४' मल्टीस्टारर फिल्म आहे त्यामुळे यांची मस्तीही मल्टीपल होणार आहे. शाळा, ज्युनियर कॉलेज नंतरचा 'बॉईज'चा हा डिग्रीचा प्रवास सुरू होणार आहे.'' बॉईज ४ मध्ये एक नवीन टिविस्ट येणार आहे . अर्थात तो आपल्याला चित्रपट




मनोरंजन विश्व

# आत्मपॅम्फ्लेट

परेश मोकाशी हे नाव ऐकलं की साहजिकच हरिश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, चि व चि सौ का, वाळवी असे त्याचे पुरस्कारप्राप्त चित्रपट आपल्याला आठवतात. आता परेश मोकाशी लिखित आणि आशिष बेंडे दिग्दर्शित 'आत्मपॅम्फ्लेट' हा चित्रपट आपल्या भेटीला आला आहे. बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील स्पर्धात्मक विभागात 'आत्मपॅम्फ्लेट' चा वर्ल्ड प्रीमिअर झाला तर आशिया पॅसिफिक स्क्रिन अवॉर्ड्स आस्ट्रेलियामध्ये सत्तर देशांतील चि त्रपटांमधून सर्वोत्कृष्ट युथ फिल्मचा पुरस्कार या चित्रपटाने मिळवला. अनेक आंतरराष्ट्रीय



चित्रपट महोत्सवात हा चित्रपट दाखवला गेला. या चित्रपटाची खासियत म्हणजे हा संपूर्ण चित्रपट परेश मोकाशी कथन करत आहेत. मराठीत अशा प्रकारचा प्रयोग पहिल्यांदाच होत आहे.अतिशय सरळ, साधा विषय अतिशय रंजक पद्धतीने

प्रेक्षकांसमोर मांडण्याचे कसब परेश मोकाशी यांच्याकडे आहे, म्हणूनच त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षक विशेष पसंती देतात. ६ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित झालेला 'आत्मपॅम्फ्लेट' हा सुद्धा याच पठडीतील चित्रपट आहे. डार्क कॉमेडी असणाऱ्या या चित्रपटात ओम बेंडखळे, प्रांजली श्रीकांत, भीमराव मुडे आणि केतकी सराफ यांच्या प्रमुख भूमिका आहेत. लेखक परेश मोकाशी म्हणतात, ''आमचे मित्र आशिष बेंडे यांचे शालेय जीवन खूपच नाट्यमय होते! अगदी बायोपिक करावा असे! मात्र, खरोखरीच त्याचा चित्रपट करताना वास्तव चित्रणाबरोबर विचित्र निवेदन आणि अतिशयोक्ती विनोदाची फोडणी दिली आहे. म्हणूनच ही नेहमीची शालेय प्रेमाची गोष्ट राहात नाही. तर त्यापलीकडे जाऊन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरची मोठी घटना होते! पुढे तर ती त्याही पलीकडे जाते.''

गुलशन कुमार, टी. सिरीज फिल्म्स, कलर यल्लो प्रोडक्शन्स आणि झी स्टुडिओज प्रस्तुत, मयसभा करमणूक मंडळी निर्मित या चित्रपटाचे भूषण कुमार, क्रिशन कुमार, आनंद एल राय, कनुप्रिया ए. अय्यर मधुगंधा कुलकर्णी आणि झी स्टुडिओज निर्माते आहेत.



गणेश आचवल
९८२१२६८३९१

# लोकमान्य सेवा संघ, पार्ले १०४वा गणेशोत्सव

शंभराहून अधिक वर्षांच्या देदीप्यमान कारकिर्दीमुळे, समाजाभिमुख उपक्रमांमुळे, नागरिकांच्या सर्व गरजांचा विचार करून सातत्याने सेवा देणाऱ्या शाखावैविध्यामुळे आणि नि:स्पृह कार्यकर्त्यांमुळे लोकमान्य सेवा संघ ही संस्था पार्ल्याची अभिमानास्पद ओळख ठरली आहे.

संस्थेची संस्कृती आणि मूळ उद्देश अबाधित ठेवून काळानुरुप बदलांना स्वीकारत नवनवीन उपक्रमांची भर घातली जाते. काही उपक्रम मात्र वर्षानुवर्षे तितक्याच उत्साहाने आणि श्रद्धेने राबवले जात आहेत. यात प्रामुख्याने नाव घ्यावे लागेल ते इथल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे. यंदाचे वर्ष हे संस्थेच्या गणेशोत्सवाचे १०४ वे वर्ष आहे.

दि. १९ सप्टेंबर ते गुरुवार दि. २८ सप्टेंबर या कालावधीमध्ये उत्साहाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पारंपरिक पद्धतीने कार्यकर्त्यांच्या उपस्थित गणरायाचे आगमन व विधिपूर्वक प्रतिष्ठापना झाली.

दि. २० सप्टेंबर रोजी कीर्तनकार श्रीमती शिल्पा मकरंद गोखले यांनी सुश्राव्य कीर्तन सादर केले. दि. २१ सप्टेंबर रोजी संस्थेच्या दिलासा शाखेच्या सभासदांनी 'प्रथम तुला वंदितो' हे सादरीकरण केले. त्याचबरोबर अवयवदान आणि देहदान याविषयी जागृती निर्माण करणारा 'समाजभान' हा कार्यक्रम देखील सादर केला. यासाठी श्री पुरुषोत्तम पवार यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.

दि.२२ सप्टेंबर रोजी सुप्रसिद्ध निवेदिका श्रीमती दीपाली केळकर यांनी 'शब्दांच्या गावा जावे' या रंजक कार्यक्रमातून शब्दांच्या गमतीजमती, त्यांचे निरनिराळे अर्थ, व्युत्पत्ती, जोडशब्द, एकाक्षरी शब्द, क्रियापदांचे वेगवेगळे अर्थ अशा अनेक पैलूंवर खुसखुशीत भाष्य केले. प्रेक्षकही त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

दि. २३ सप्टेंबर रोजी 'स्वरांगिनी'तर्फे श्रीमती संपदा नाडकर्णी आणि त्यांच्या विविध वयोगटातल्या शिष्यगणांनी मराठी-हिंदी गाण्यांचे बहारदार सादरीकरण केले.

दि. २४ सप्टेंबर हा दिवस होता सुरांमध्ये रंगून जाण्याचा. मान्यताप्राप्त गायिका श्रीमती यशस्वी सरपोतदार यांनी शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन सादर करताना सावनीकल्याण व बसंत रागातील सुरेल बंदिशी आणि तराणा सादर केला.

दि. २५ सप्टेंबर रोजी डॉ.वंदना बोकिल कुलकर्णी यांनी 'रारंगढांग – एक दृक्श्राव्य अनुभव' हा अभिनव कार्यक्रम सादर केला. प्रभाकर पेंढारकर यांनी तयार केलेला 'बॉर्डर रोड्स' हा माहितीपट आणि त्याच विषयावरील त्यांची रारंगढांग ही गाजलेली कादंबरी यांची सुरेख सांगड त्यात घातली होती. या संपूर्णपणे साहित्यविषयावरील कार्यक्रमाला मिळालेली प्रेक्षकांची दाद उत्साहवर्धक ठरली. दि. २६ सप्टेंबर रोजी पं.रवी चारी आणि श्री सत्यजित तळवलकर यांनी 'स्वरानंद –एक सुरमयी अनुभूती' ही अत्यंत श्रवणीय मैफल सादर केली. यमन व बागेश्री रागातील सतारीचे सुर व त्याला उठाव देणाऱ्या तबला वादनाने मोठ्या संख्येने




उपस्थित असलेल्या संगीतप्रेमींची मने जिंकली.

तसेच दि. २७ सप्टेंबर रोजी डॉ.रुपाली देसाई व त्यांच्या शिष्यांनी 'नृत्याधिष्ठान गणेश' हा दर्जेदार कार्यक्रम सादर केला. दिशा देसाई यांच्या नृत्य दिग्दर्शनाने नटलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने संस्थेतर्फे कलाकारांना उत्तेजन देणाऱ्या 'आरती कलाविष्कार' या आगळ्यावेगळ्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सुवाच्य हस्ताक्षरात कुठल्याही प्रचलित आरतीचे पोस्टर तयार करून ते कल्पकतेने सजवणे अपेक्षित होते. तीन वयोगटांमध्ये घेण्यात आलेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली. तसेच सर्व पोस्टर्सचे प्रदर्शन मांडण्यात आले. श्रीमती बागेश्री परिख व श्री.अनीश दाते यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून जबाबदारी सांभाळली. १० सप्टेंबर रोजी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळादेखील घेण्यात आली. विविध वयोगटातल्या कलाप्रेमींनी यात उत्साहाने सहभाग घेतला

गणेशोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत करमणुकींच्या कार्यक्रमाबरोबरच सहस्त्रावर्तन, भजन, मंत्रपुष्प असे धार्मिक कार्यक्रमही यथासांग पार पडले.

गुरुवारी अनंत चतुर्दशीला विजा आणि गडगटासह पडणा-या जोरदार पावसाची तमा न बाळगता, टिळक मंदिराभोवतालच्या रस्त्यावरून प्रदक्षिणा घालत ढोल, झांजांच्या गजरात व्यायामशाळेच्या विद्यार्थ्यांच्या लेझीमच्या तालात श्रींची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.



चित्रा वाघ
९८२११ १६९३६

# उत्सव उद्योजकतेचा

व्यवसाय करू पाहणाऱ्या आणि करणाऱ्या सर्व व्यावसायिकांसाठी पार्लेबाझार डॉट कॉमने पहिल्यांदाच उद्योजकांच्या कथा, त्यांच्या यशाचा प्रवास, प्रेरणादायी अनुभव सांगणारा 'बिझ मास्टर्स' हा व्यवसायांशी संबंधित कार्यक्रम १ ऑक्टोबर रोजी विलेपार्ले येथील साठ्ये महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित केला होता. कार्यक्रमाची सुरुवात निवेदक श्री संतोष जाधव यांच्या आकर्षण शब्दांनी झाली. या कार्यक्रमाला श्री संजीव लाटकर, श्री गजेंद्र देवडा, श्री माधवी पेठे, श्री मिलिंद जोशी, श्री उदय तारदाळकर हे परिक्षक म्हणून लाभले होते. कार्यक्रमात स्वत:च्या क्षेत्रात नावलौकिक करणाऱ्या डॉ. वृशाली नाडकर्णी, ओम क्रिएशन, साजिरी साडीज्, वि. एम. मुसळूणकर सन्स अॅन्ड ज्वेलर्स, मुसळूणकर ज्वेलर्स, आराध्य क्रिएशन, वॉरियर इंक, आसन योगा, अल्ट्रा वेलनेस, ओबेरॉन मॉड्यूलर, चेतन शहा, डायनिंग डिलाइटस्, एम. एच. कॉम्प्युटर्स, तक्ष रियलटर्स, वेल्थनेस, ग्लोब वॉंडरर् अशा अनेक व्यावसायिकांनी सहभाग नोंदवला होता. संपूर्ण कार्यक्रमाचे 'पार्लेबाझार' (www.parlebazaar.com)च्या युट्युब चॅनेलवर थेट प्रक्षेपण होत होते. प्रत्येक उद्या`जकाने आपल्या व्यावसायाचे उत्तम असे सादरीकरण केले. कार्यक्रमाचा शेवट जवळ आला आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री पूर्वेश शेलटकर यांचे आगमन झाले. शेलटकर यांनी आपल्या अनुभवाने आणि प्रेरक शब्दांनी उद्योजकांना मार्गदर्शन केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या महत्त्वाच्या म्हणजेच पुरस्कार सोहळ्याला सुरूवात झाली. परीक्षकांनी स्ट्रॅटर्जी आणि ब्रॅण्डिंग, टेक्नॉलॉजी आणि इनोवेशन, ग्रोथ अँड सुस्टॅनबिलिटी अशा तीन श्रेणीमध्ये पुरस्काराची विभागणी केली होती. स्ट्रॅटर्जी आणि ब्रॅण्डिंग या श्रेणीमध्ये अनुक्रमे 'आसान योगा', 'वी.एम.मुसळुनकर अँड सन्स (गोल्ड)', 'वेल्सनेस' यांनी पारितोषिक पटकावली. तत्सम टेक्नॉलॉजी आणि इनोवेशन या श्रेणीमध्ये अनुक्रमे 'तक्ष रियलटर्स', 'एम एन राव', 'ओबेरॉन मॉड्युलर' हे विजयी ठरले. त्यानंतर तिसरी श्रेणी म्हणजेच ग्रोथ अँड सुस्टॅनबिलिटी या श्रेणीमध्ये अनुक्रमे 'ओम क्रिएशन', ' डॉ. वृशाली स्किनयोलॉजिस्ट यांना विजयी पद मिळाले. सर्व विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. समारोपणाच्या वेळी आयोजकांनी ''पुढील येणाऱ्या वर्षात देखील असे कार्यक्रम आयोजित केले जातील'' असे आश्वासन दिले.









# श्री प्रशांत अनंत राऊत यांना फादर स्टीफन सुवार्ता वाड्मयीन पुरस्कार जाहीर

कवी व लेखक श्री प्रशांत अनंत राऊत यांना २०२१ - २२ चा 'कोकण मराठी साहित्य परिषद' या नामांकीत संस्थेचा फादर स्टीफन सुवार्ता वाड्मयीन पुरस्कार जाहीर झाला आहे. 'वैचारिक साहित्य' या लेखनविभागात 'आनंद नांदे अंतरी' या प्रशांत राऊत यांच्या आध्यात्मिक पुस्तकाची कोमसापच्या केंद्रीय समिती अंतर्गत पुरस्कार समितीने निवड केली आहे. प्रशांत राऊत यांच्या लेखनाला कोमसापतर्फे मिळालेला हा पहिला पुरस्कार आहे.प्रशांत राऊत हे कोमसापच्या विलेपार्ले शाखेच्या कार्यकारिणीवर कार्यरत असून पार्ल्यातील इतर साहित्य संस्थांशी जोडलेले आहेत.



'आनंद नांदे अंतरी' या पुस्तकाला सुप्रसिध्द संत साहित्यिका माननीय रेखाताई नार्वेकर यांची प्रस्तावना लाभली असून मराठी अनुवाद सुप्रसिध्द लेखिका मधुमंजिरीताई गटणे यांनी केला आहे. पुस्तकाचे मुद्रण तरूण पालघर साप्ताहिकाचे संपादक माननीय सच्छिदानंद महाडिक यांच्याशी संलग्न असलेल्या सुगी ग्राफिक्सच्या सुरेखा राणे यांनी केले आहे.

# 'चिंध्या अनुबंधांच्या' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा

मंगळवार दिनांक १० ऑक्टोबर रोजी साठ्ये महाविद्यालयाच्या सभागृहात सायंकाळी ६:३० वाजता लेखक समीर विजया रमेश धोंड यांच्या 'चिंध्या अनुबंधांच्या' या पहिल्या मराठी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. या प्रकाशन सोहळ्याची सुरुवात समीर धोंड यांचा परिचय करून देणाऱ्या चित्रफिती ने झाली. त्यानंतर मराठी, हिंदी नाटक, मालिकेतील कलाकार श्री संदीप कुलकर्णी यांनी समीर धोंड लिखित 'चिंध्या अनुबंधांच्या' या पुस्तकातील काही परिच्छेद वाचून प्रकाशन सोहळ्याला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. त्यानंतर निवेदिका उल्का पसाळकर यांनी संदीप कुलकर्णी आणि समीर धोंड यांची प्रेक्षकांना ओळख करून दिली व लगेचचं मुलाखतीला सुरुवात केली. मुलाखती दरम्यान प्रेक्षकांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे उलगडत गेली तसेच 'चिंध्या अनुबंधांच्या' या पुस्तकाचा पाया कसा रचला गेला हे सुद्धा समजले.हे पुस्तक म्हणजे समीर धोंड यांना पडलेल्या काही प्रश्नांचा, मनात आलेल्या काही विचारांचा, निसर्गाकडून शिकलेल्या लहानमोठ्या धड्यांचा, पक्ष्याप्राण्यांकडून मिळालेल्या कडूगोड शिकवणीचा आणि सगळयात महत्त्वाचं म्हणजे लेखकाच्या भोवताली घडलेल्या निवडक गोष्टींच्या निरीक्षणांचा संग्रह आहे.





कार्यक्रमाच्या शेवटी प्रेक्षकांनी 'चिंध्या अनुबंधांच्या' या पुस्तकाच्या प्रती खरेदी करण्यासाठी विशेष असा उत्साह दर्शवला.